REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# विठ्ठल वाघांच्या कवितेतील सामाजिक चित्रण

डॉ. अजय कुळकर्णी
सी.पी.अँड बेरार महाविद्यालय, नागपूर.

**प्रस्तावना :**




विठ्ठल वाघांची कविता ही आशयसंपन्न आहे. कवितेतील अनुभवविश्व, भावविश्वातून प्रकटलेला आशय त्या कवितेची एक स्वतंत्र ओळख असते. “वाघांची सामाजिक जाणीव तीव्र आहे. त्यांच्या सामाजिक कवितांमधून जीवनवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. दाहक समाज वास्तवाचा धगधगीत वणवा त्यांनी आपल्या उरात जोपासला आहे”[१] कविता हा वाङ्मयप्रकार ठरवून लिहिता येत नाही. काव्यनिर्मिती ही एक प्रकारे नैसर्गिक स्वरुपाची निर्मिती आहे. विठ्ठल वाघ यांच्या पाठीमागे ग्रामीण जीवनानु  वाचा धगधगता अनु  व ज्याप्रमाणे आहे त्याप्रमाणेच नैसर्गिक स्वरूपाची प्रति  ाशक्तीही त्यांना लाभलेली आहे. ग्रामीण समाजजीवनाचा दाहक अनुभव त्यांनी प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे त्यांची कविता ही अनेक सामाजिक संदर्भ घेऊन येते. हे संदर्भ अगदी आशयपूर्ण स्वरूपाचे आहेत–

> “वात भिजन्यापुरतं तेलं नाही दिव्यातून
> राहे सनही उपासी गोळं घास नसल्यानं
> महादेव सस्ता झाला महागलं बेलपानं
> आमी आरतीचे दिप नाही तूप नाही वात”[२]

अशा स्वरूपाची वास्तवदर्शी सामाजिक जाणीव घेऊन ही कविता प्रकटली आहे. कष्टकरी, श्रमकरी वर्गाचे चित्रण यातून व्यक्त होते. मातीशी प्रामाणिक राहून अहोरात्र कष्ट करणाऱ्या कास्तकारांच्या जगण्यातील वास्तविक दाहकतेची ही आशयपूर्ण काव्यरचना आहे. शहरीकरण, कारखानदारी व्यवस्था एका बाजूने तर कष्टकरी शेतकऱ्यांची शेती, निसर्गांचा अनियमितपणा आणि राजकारण्यांच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे कौटुंबिक जीवन कसे उद्ध्वस्त होत आहे. याचा प्रत्यय वाघ यांच्या कवितेतून येतो. विठ्ठल वाघांची कविता ही ग्रामीण समाजातील शेकडो शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या जगण्यातील, व्यक्तीमाणसांच्या आयुष्यातील धगधगती चित्रणे घेऊन व्यक्त झालेली आहे. शेतकऱ्यांच्या घरादारात अहोरात्र कष्ट करून देखील सण, उत्सव उपासपोटी साजरा करावा लागतो, वात भिजण्यापुरते घरात तेल सापडत नाही, तर दुसऱ्या बाजूने वाढत्या शहरातील प्रचंड मोठा चंगळवाद पाहताना ही विषमतावादी रचना आणि शेतकऱ्यांचे जगणे कशा स्वरूपाने उद्ध्वस्त होत आहे या आशयाची सूत्रबध्दता वाघांच्या कवितेत अनुभवता येते.

वाघांची कविता एका बाजूने मनोरंजनात्मक रूपाने आविष्कृत होण्याबरोबर प्रखर असे सामाजिक चित्रण अभिव्यक्त करताना आढळते. “एकीकडे कल्पनाविस्तारात रमणारी गोड प्रतिमाजलात गुरफटून घेणारी कविता तर दुसरीकडे कल्लोळणाऱ्या वास्तवाच्या जाणीवा हृदयावर गोंदवणारी ही कविता आहे?”[३] वाघांची कविता सामाजिक वास्तवाला घेऊन प्रकटलेली आहे. अर्थात ती केवळ प्रचारकी रूप धारण करत नाही तर त्यातला आशय हा अर्थपूर्ण, चिंतनशील स्वरूपाचा असतो. ज्या प्रकारे मनोरंजनात्मक रूपाने ग्रामीण कुटुंब नातेसंबधांचे हळूवार धागे वाघांच्या कवितेतून अवतरतात तशा प्रकारे

"मुळे पिकाची मातीत आम्ही रुजवतो खोल
जरा घामाची, रक्ताची त्यास पुरवितो ओल
वासातून देत वारा तळहाती जोजवितो
काळजाच्या पाळण्यात रातंदिस झुलवितो
कधी कुणब्या घरची अशी रीतभात असे
आता उरी जपायचे तिच्या पावलांचे ठसे! (४)

शेकडो वर्षापासूनची ही रितभात आहे. विठ्ठल वाघांनी या कवितेत व्यक्त केलेला सामाजिक आशय हा अत्यंत चिंतनशील असा आहे. घाम, रक्त आटवून शेती फुलवणाऱ्या माणसांचे जगणे अखेर उपासमारीचे, कष्टी, श्रमाचेच आहे. ही सामाजिक वास्तवाची जाणीव वाघांच्या कवितेतून पाहताना व्यक्तिकेंद्रित अनुभूतीच्या वर्तुळात ही कविता अडकत नाही तर प्रखर असे सामाजिक वास्तवाचे संदर्भ घेऊन ती येत असते. या त्यांच्या कवितेतील प्रखर सामाजिक वास्तवाची जाणीव पाहता प्रा. गो.मा. पवारांनी ग्रामीण साहित्य आणि त्यातून प्रकटणाऱ्या सामाजिक वास्तवांच्या चित्रणावरून अस्सल ग्रामीण साहित्य कुणास म्हणावे याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. 'ग्रामीण संवेदनशीलता ज्या लेखनातून प्रत्ययाला येत असेल ते अस्सल ग्रामीण साहित्य होय. अनेकदा ग्रामीण तपशील अचूक भरलेल्या ग्रामीण भाषेतील लेखनातून ही ग्रामीण संवेदनशीलता प्रत्ययाला न येता कमालीची व्यक्तिकेंद्रित संवेदनशीलताच आढळण्याचीही शक्यता असते. हे लेखन तकलुपी स्वरूपाचे ग्रामीण साहित्य म्हणावे लागेल.(५) वाघांची सामाजिक जाणीवही वास्तव आहे. ग्रामीण जीवनानुभवाच्या पार्श्वभूमीतून ही कविता अभिव्यक्त होत जाते. ती एक अस्सल ग्रामीण कविता म्हणून पाहताना त्यामधून प्रकटणाऱ्या आशय आणि अभ्जिव्यक्तीवरून अनुभवता

"माझ्या काळया मातीतून यावे उजेडाचे पीक
नको पोटाच्या शिवेत काळोखाची मायभूक
ऐन दुपारी शिवारी फुलो चांदण्याचा मळा
कपाशीच्या नख्खीतून उमलाव्या चंद्रकळा
निळया नभातून यावा खाली पाखरांचा थवा
उजेडाचे दान देता धन्य कापसाचा दिवा"(६)

शेती–मातीचा आणि शेतकऱ्यांचा अतूट सबंध आहे. मातीतून उगवणाऱ्या धान्यातून शेतकऱ्यांची स्वप्ने फुलत असतात. सामाजिक वास्तव आणि जाणिवा प्रकट करताना वाघांची कविता आशावादी मनोवृत्तीतून व्यक्त झालेली आहे. वाघांनी आपल्या कवितेतून ग्रामीण, कष्टी, श्रम करणारा माणूस हा आशावादी वृत्ती, नियतीवर विश्वास ठेवून जगणारा, उद्याच्या दिवसाचे स्वप्न पाहणारा या कवितेतून अभिव्यक्त केला आहे. ग्रामीण माती माणसाबरोबर, सामाजिक सत्य व्यक्त करण्याबरोबर ती कविता प्रखर स्वरूपाची भूमिका घेऊन अभिव्यक्त होते.

"आरे बदला पुढे बदला चाक मातर फिरतं ठेवा
धुरकरी व्हा कोनी राजा गाळं मातर चालतं ठेवा"(७)

या सामाजिक वास्तवाचा शोध घेताना प्रखर परिर्वतशील भूमिका वाघांच्या कवितेतील आशय आणि अभिव्यक्तीतून साकारते. "त्यांची कविता परिवर्तनावर विश्वास ठेवणारी आहे. ती आशावादी आहे. क्रांतीचे बळ देण्याचं सामर्थ्य तिच्यात आहे. भावकवितेकडून सामाजिक आशयाकडे असा विठ्ठल वाघांच्या कवितेचा प्रवास आहे.(१५) अर्थात विठ्ठल वाघ यांची कविता साठोत्तरी कवितेत इतर कवींच्या तुलनेत आशयअभिव्यक्तीकडून एक स्वतंत्र रूप धारण करुन व्यक्त झाल्याचे आढळते. 'तिफन', पन्हाटी, 'खापराचे दिवे, मानूस', 'मेढेर', 'तरंग', 'आक्के', तू (वैदभी) या सारख्या अनेक कविता सामाजिक वास्तवाचे भान घेऊन वाघांच्या काव्यनिर्मितीच्या अगदी प्रारंभीच्या काळापासून निर्माण झाल्याचे आढळतात.

## संदर्भ ग्रंथ सूची:

१. तराळ सतीश, दै. तरूणभारत दि. २५.११.१९९२
२. वाघ विठ्ठल "वैदर्भी" पृ. ७

३. सावदेकर आशा "कविता विदर्भाची" पृ. ४६
४. वाघ विठ्ठल "गावशिव" पृ. ७९
५. पवार गो.मा, "साहित्यमूल्य आणि अभीरूची" पृ. १९३
६. वाघ विठ्ठल, "कपाशीची चंद्रफुले" पृ. ३७
७. वाघ विठ्ठल, "काया मातीत मातीत" पृ. ३०